## देशातील २५ टोल प्लाझा हटणार; लवकरच नवी प्रणाली



**नवी दिल्ली :** केंद्र सरकार लवकरच देशातील २५ राष्ट्रीय महामार्गांवरील टोल प्लाझा हटवण्याची मोठी योजना आखत आहे. यासाठी, मल्टी-लेन फ्री फ्लो (MLFF) ही नवीन टोलिंग प्रणाली सुरू केली जात आहे. रस्ते वाहतूक आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, या योजनेचा मुख्य उद्देश टोल वसुलीची प्रक्रिया अधिक कार्यक्षम बनवणे आणि देशभरात जलद व स्मार्ट महामार्ग नेटवर्क तयार करणे हा आहे. MLFF ही एक अडथळामुक्त टोलिंग प्रणाली आहे. यामध्ये टोल प्लाझावर थांबण्याची गरज नाही. उच्च कार्यक्षमता असलेले RFID रीडर्स आणि ANPR (ऑटोमॅटिक नंबर प्लेट रिकग्निशन) कॅमेरे वाहनांवरील फास्टॅग आणि नंबर प्लेट स्कॅन केले जाते. यामुळे वाहन न थांबता टोलची रक्कम स्वयंचलितपणे कापली जाते. या प्रणालीमुळे वाहतूक कोंडी आणि गर्दीची समस्या कमी होईल.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ४५
www.ramprahar.com

सोमवार, १ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


### अंतरंग


युपीएससीच्या विद्यार्थ्यांसाठी 'प्रतिभा सेतू' -पंतप्रधान/२

गणेशोत्सवात धरणा कॅम्प गावात भजनाची परंपरा/३

माणगाव ही दक्षिण रायगडची राजधानी होईल -खा.तटकरे/५


# आरक्षणासंदर्भात महाधिवक्त्यांचा सल्ला घेणार

## मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीनंतर राधाकृष्ण विखे-पाटील यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

सरसकट मराठा समाजाला कुणबी जात प्रमाणपत्र देऊन ओबीसी प्रवर्गात समावेश करण्याची मागणी मनोज जरांगेंनी केली आहे. त्यांच्या मागण्यांबद्दल राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत चर्चा झाली. मागण्यांवर निर्णय घेताना आणि घेतल्यानंतर कायदेशीर पेच निर्माण होऊन नये म्हणून राज्याचे ॲडव्होकेट जनरल (महाधिवक्ता) यांचा सल्ला घेण्याचे ठरले.



राज्य सरकारने मराठा आरक्षण आणि मनोज जरांगे यांच्या मागण्यांसंदर्भात राज्य मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन केली आहे. राधाकृष्ण विखे-पाटील या समितीचे अध्यक्ष आहेत. रविवारी (दि.३१) या समितीची बैठक झाली. यानंतर राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले की, मनोज जरांगे यांनी केलेल्या मागण्यांबाबत कोणतीही त्रुटी राहू नये, तसेच अंमलबजावणीच्या प्रक्रियेत अडचणी निर्माण होऊ नयेत, यासाठी राज्याचे ॲडव्होकेट जनरल यांचे मार्गदर्शन घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

### मराठा आरक्षण कायदेशीर मार्गाने देण्याचा प्रयत्न -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून मराठा आरक्षणाचा मुद्दा पेटला आहे. मनोज जरांगे पाटील हे त्यांच्या हजारो



कार्यकर्त्यांसह मुंबईत दाखल झाले असून बेमुदत उपोषणाला बसले आहेत. रविवारी (दि.३१) त्यांच्या उपोषणाचा तिसरा दिवस आहे. जरांगे यांच्या आंदोलनाला राज्यभरातून पाठिंबा मिळत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षणाच्या प्रश्नावर महत्त्वाची टिप्पणी केली आहे. ते म्हणाले, आम्ही चर्चेतून मार्ग काढण्याचा आणि कायदेशीर मार्गाने आरक्षणाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत आहोत.



**पनवेल : टपाल नाका येथील श्री गणेश मित्र मंडळाचा पर्यावरणपूरक बाप्पा.**





**पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या रविवारी मन की बात कार्यक्रमाच्या १२५व्या भागात देशाला संबोधित केले. या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन शिवाजीनगर येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी करण्यात आले होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, भाजप नेते वैकुंठ पाटील, संजय म्हात्रे, पुरण पाटील, जीवन गावंड, गोपीशेठ म्हात्रे, अजित जोशी, दीपक म्हात्रे, परेश पाटील, सागर रंधवे आदी उपस्थित होते.**

## कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू होणार

**नवी दिल्ली** : डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून भारत आणि अमेरिकेमध्ये टॅरिफ वादावरून संबंधात तणाव निर्माण झाला होता. असे असताना चीन आणि भारतातील संबंधांमध्ये सुधारणा होत असल्याचं दिसत आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तब्बल सात वर्षांनी चीनच्या दौऱ्यावर गेले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी शांघाय सहकार्य संघटनेच्या परिषदेसाठी तिआंजिनमध्ये उपस्थित आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी चीनमध्ये असताना चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांच्यात द्विपक्षीय संबंधाबाबत महत्त्वाची चर्चा झाली. बैठकीत सीमा व्यवस्थापनाबाबत आमच्या विशेष प्रतिनिधींमध्ये एक करार झाला आहे. कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरु झाली आहे. तसेच दोन्ही देशांतील थेट उड्डाणेदेखील पुन्हा सुरू होणार आहेत. त्यामुळे संपूर्ण मानवतेच्या कल्याणाचा मार्गही मोकळा होईल.

## निवडक

### 'दगडूशेठ'ला १३३ लिटर संत्र्याच्या आईस्क्रीमचा नैवेद्य



**पुणे :** तब्बल १३३ लिटर फ्रेश दूध, नॅचरल ऑरेंज पल्प व त्यामधील संत्र्याच्या सालींचा क्रश वापरून तयार केलेले १३३ लिटर संत्र्याच्या आईस्क्रीमचा नैवेद्य श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला दाखविण्यात आला. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने यंदा १३३ व्या वर्षी गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे.

### प्रेम सागर यांचे निधन

**मुंबई :** प्रसिद्ध चित्रपट निर्माते रामानंद सागर यांचा मुलगा आणि निर्माते शिव सागर यांचे वडील प्रेम सागर (वय ८४) यांचे रविवारी (दि.३१) निधन झाले. अनेक वर्षांपासून ते आजारी होते आणि त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्या निधनानं कलाविश्वावर शोककळा पसरली आहे.

## म्हसळ्यात रिक्षाचा अपघात; तिघे ठार, चार जण जखमी

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यांतील कासारमलई आंबेत फाट्याजवळील तिव्र उतारावर रविवारी (दि.३१) (एमएच ०६ एएल ८३३१) प्याजो ऑटो रीक्षाचे नियंत्रण सुटून सिमेंट दिशादर्शक फलकावर रिक्षाने ठोकर मारल्याने गंभीर अपघात होऊन रिक्षामधील तीन प्रवासी मयत तर चार प्रवासी जखमी झाल्याचे म्हसळा पोलिसांनी सांगितले.

यामध्ये रिक्षा चालकासह पुढील तिघे संतोष नाना सावंत (वय ४०), प्रमिला तुकाराम धोपते (वय ५०), शांताराम कालिदास धोपते (वय ६२) सर्व राहणार कणघर हे मयत झाले तर चौघे जखमी प्रकाश धडावे, संतोष मगर, कविता संतोष मगर, पांडुरंग धोपते सर्व राहणार कणघर ता. म्हसळा कणघर येथील महिला व पुरुष संदेरी येथील कुणबी समाजाची बैठक आटपून परतत होते. या वेळी म्हसळा पोलीस ठाणे हद्दीतील आंबेत फाटा जवळील कासार मलाईच्या तिव्र उतारावर रीक्षा गाडीचा ब्रेक फेल झाल्याने गाडी वरील चालकाचा ताबा सुटला आणि अपघात झाला. ही माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप कहाळे यांनी दिली. रस्त्यालगतच्या सिमेंट दिशादर्शक फलकाला गाडी धडकल्याने अपघाताची तिव्रता वाढली, असे प्रत्यक्ष बघणाऱ्यांनी सांगितले.

## उरण बाह्यवळण रस्ता येत्या सहा महिन्यांत सुरू

### आमदार महेश बालदी यांची माहिती; निधी होणार उपलब्ध

**उरण : प्रतिनिधी**

शहरातील वाहतूक कोंडीवर महत्वपूर्ण उपाय असलेल्या उरण बाह्यवळण (बायपास)मार्गात नगरपरिषद हद्दीतील जमिनीचे भूसंपादन व पुनर्वसनासाठी लागणारा १२ कोटी रुपयांचा निधी लवकरच उपलब्ध होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या सहा महिन्यात हा बहुप्रतिक्षित मार्ग सुरू होण्याची आशा निर्माण झाली आहे. निधी उपलब्ध होत नसल्याने या मार्गात अडथळा निर्माण झाला आहे. यासाठी लागणारा निधी येत्या काही दिवसात उपलब्ध होईल आणि त्यामुळे सहा महिन्यात हा मार्ग प्रवासासाठी उपलब्ध होईल, अशी माहीती उरणचे आमदार महेश बालदी यांनी दिली आहे.



हा मार्ग रखडल्याने उरणच्या प्रवासी व नागरिकांना आणखी काही महिने या मार्गाची प्रतिक्षा करावी लागणार आहे. उरण शहर आणि परिसराचे झपाट्याने नागरीकरण सुरू आहे. येथील लोकल, रस्ते मार्ग, जलमार्ग यांनी जोडले गेले आहे. त्यामुळे नागरीवस्ती वाढू लागली आहे. त्यामुळे शहरातील वाहनामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीत भर पडली आहे.

उरण बाह्यवळण मार्गाचा प्रस्ताव २००१ साली पहिल्या युती सरकारच्या काळात उरण शहरातील वाहतूक कोंडीवर उपाय म्हणून शहराला जोडणाऱ्या उरण - पनवेल या मुख्य मार्गालगत मोरा मार्गाला जोडणारा बाह्यवळण मार्ग प्रस्तावित होता.

## अभिनेत्री प्रिया मराठेचे निधन

**मुंबई :** मराठी चित्रपटसृष्टीमधील अतिशय लोकप्रिय अभिनेत्री प्रिया मराठेचे रविवारी (दि.३१) पहाटे निधन झाले आहे. वयाच्या ३८व्या वर्षी तिने मीरा रोड येथील राहत्या घरात अखेरचा श्वास घेताल.



प्रियाची कर्करोगाशी झुंज अपयशी ठरली. प्रियाच्या निधनानंतर संपूर्ण सिनेसृष्टीमध्ये शोक व्यक्त केला जात आहे. नाटकात तसंच टिव्हीवरील अनेक मराठी आणि हिंदी मालिकांमध्ये प्रियाने काम केले होते. 'तुझेच मी गीत गात आहे' ही तिची अखेरची मालिका तर 'अ परफेक्ट मर्डर' हे शेवटचे नाटक ठरले.

## सोनपावलांनी गौराईचे आगमन



**अलिबाग : प्रतिनिधी**

### महिलावर्गात उत्साह

बुधवारी घरोघरी गणेशाचे आगमन झाले होते. त्यानंतर रविवारी (दि.३१) तीन दिवसांची पाहुणी असलेल्या गौराईंचे घरोघरी आगमन झाले. गौरीच्या आगमनामुळे खासकरून महिलावर्गात उत्साहाचे वातावरण आहे.


कोकणात गणेशोत्सवाचा उत्साह टीपेला पोहोचला आहे. दुपारनंतर मुली आणि महिला गौरी आणण्यासाठी गेल्या. कोकणात तेरडयाच्या गौरी आणल्या जातात. परंपरेनुसार माळरानावरून तेरडयाच्या गौरींचे घरोघरी वाजतगाजत आणण्यात आल्या. त्यानंतर गौरी सजवण्यात आल्या. वस्त्रालंकारांचा साजश्रृंगार चढवण्यात आला. भेंडीच्या फुलांनी पूजा करण्यात आली. महिलांनी गौराईची सामुहिक आरती केली. आवडता भाजी भाकरीचा नैवेद्य दाखवण्यात आला. रात्री जेवणानंतर गौरीचे स्तवन झाले. महिलांची नाचगाणी फुगडया आदी खेळांना रंगत आली.

मागील चार दिवसांपासून जिल्हयात पावसाने ठाण मांडले होते, मात्र शनिवारपासून पावसाने उघडीप घेतल्याने गणेशोत्सवासाठी गावी आलेल्या कोकणवासीयांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. जिल्ह्यात १५ हजार ८३२ गौराईंचे आगमन झाले.

सणासाठी महिला मोठ्या संख्येने माहेरी आल्या आहेत. सोमवारी गौरीपूजन केले जाणार आहे यंदा गौरीपूजन पूर्वा नक्षत्रावर असल्याने नवविवाहीतांचे ओवसे होणार आहेत. मंगळवारी सायंकाळी गौरींचे विसर्जन केले जाणार आहे.







# युपीएससीच्या विद्यार्थ्यांसाठी 'प्रतिभा सेतू'

## 'मन की बात'मध्ये पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अनेक तरुण कठोर परिश्रमाने युपीएससीची (णझडउ) परीक्षा उत्तीर्ण होऊन यश मिळवतात, याच परीक्षेत हजारो तरुण खूप सक्षम असतात मात्र थोड्या फरकाने अंतिम यादीत पोहोचू शकत नाहीत. आता अशा हुशार विद्यार्थ्यांना 'प्रतिभा सेतू' सारख्या प्लॅटफॉर्म द्वारे नामांकित खाजगी कंपन्या नोकऱ्या देतील, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि.३१) केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि.३१) 'मन की बात' कार्यक्रमाच्या १२५ व्या भागात देशाला संबोधित केले. यावेळी पंतप्रधान मोदींनी काश्मीरमधील सामने, यूपीएससी परीक्षा, डोंगराळ भागात झालेला विनाशकारी पाऊस आणि भूस्खलन अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली.

पंतप्रधान मोदींनी 'मन की बात' कार्यक्रमाची सुरुवात



नैसर्गिक आपत्तींपासून केली. डोंगरांमध्ये पाऊस आपत्ती बनला आहे. एनडीआरएफ आणि एसडीआरएफ पथकांसह सुरक्षा दलांनी सर्व शक्य मदत करण्यासाठी दिवसरात्र मेहनत घेतली आहे. सांगतानाचा त्यांनी बचाव कार्याचीही माहिती दिली.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, अनेक तरुण कठोर परिश्रमाने युपीएससीची परीक्षा उत्तीर्ण होऊन यश मिळवतात. मात्र याच परीक्षेतील एक कटू सत्य म्हणजे हजारो तरुण खूप सक्षम असताना थोड्या फरकाने ते अंतिम यादीत पोहोचू शकत नाहीत. आता अशा हुशार विद्यार्थ्यांसाठी प्रतिभा सेतू नावाचे डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यात आले आहे. या प्लॅटफॉर्मवर अशा १० हजारांहून अधिक तरुणांची माहिती आहे. या पोर्टलच्या मदतीने खाजगी कंपन्याही हुशार उमेदवारांना नोकऱ्या देऊ शकतात.

ऑपरेशन पोलोचा संदर्भ देत पंतप्रधान मोदी म्हणाले की, पुढच्या महिन्यात आपण हैदराबाद मुक्ती दिन देखील साजरा करू. लोहपुरुष सरदार पटेल यांनी सरकारला ऑपरेशन पोलो सुरू करण्याची विनंती केली आणि विक्रमी वेळेत सैन्याने हैदराबादला निजामाच्या अत्याचारातून मुक्त केले आणि देशाचा एक भाग बनवले, असेही ते म्हणाले.

# गौरीसाठी लागणाऱ्या वस्तू घेण्यास लगबग; बाजारपेठेत गर्दी



**चौक : प्रतिनिधी**

गौराईचे रविवारी आगमन असल्याने गौरीहार, गौरी चे हाथ, गौरीची फुले,रानटी फुले, कौंडली, तेरडा आणि सुप यांनी चौक बाजारपेठ सजली आहे. गौराईचे आगमन होणार असल्याने भर पावसात बाजारात खरेदीसाठी गर्दी उसळली होती.

सायंकाळ पर्यंत गौरौचे शुभ आगमन होणार आहे. गौरी आईला आवडणारी रानटी फुले,तेरडा, गौरी हार घेण्यास महिला भगिनींची चौक बाजारात गर्दी उसळली आहे. आजही पावसाचे आगमन झाले आहे.परंतु खरेदी करणारे आणि विक्री करणारे पावसातच आपापली कामे करताना दिसत आहे. यंदा नव विवाहित यांचे ओवसे असल्याने बाजारात सुपे विकण्यास आणि घेण्यास लगबग सुरू झाली आहे. अडीचशे ते तीनशे रुपये एका सुपाची किंमत आहे. आज बाजारात मिळेल त्या किमतीत हार, फुले खरेदी होत असताना दिसत आहे. गौरीपुजन पूर्वा नक्षत्र असल्याने नवविवाहितांचे ओवसे होणार आहेत.

दीड दिवसांच्या गणरायांना निरोप दिल्यावर वेध लागलेत ते गौराईच्या आगमनाचे. विशेषतः महिला व नव विवाहित यांना गौराईच्या आगमनाची ओढ मोठ्या प्रमाणात असते.

नव विवाहित यांचे पहिले गौरी पूजन म्हणजे ओवसे माहेरी होतात, त्यामुळे नव विवाहित माहेरी आल्या असून गौरी पूजन करून लगोलग सासरी जाण्याची तयारी असते, त्या ठिकाणी आपल्या घरच्या म्हणजे सासरच्या गौरीला सुपाने ओवाळून वान दिले जाते, प्रथम ओवसे पूजनाला नव विवाहित हिला सोन्या मोत्याचा दागिना देण्याची प्रथा काही ठिकाणी आजही आहे.

# खालापुरातील आदर्श मित्र मंडळाच्या गणेशोत्सवाला ५० वर्षे पूर्ण

**खालापूर :** तालुक्यातील सर्वात मोठे आणि ५० वर्षांची कारकिर्द लाभलेल्या आदर्श मित्र मंडळ यांच्या गणेशोत्सवाला यंदा ५० वर्ष पूर्ण होत आहेत. उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्यासह उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, मोतीराम ठोंबरे, प्रवीण मोरे यांनीही दर्शन घेतले. दहा दिवसांत विविध धार्मिक कार्यक्रम,आरोग्य शिबिर, विविध समाज उपयोगी कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. मंडळाचे अध्यक्ष नितीन देशमुख यांनी आमदार महेश बालदी यांचा सन्मान केला. यावेळी विनोद भोईर, बाबू भोईर, हर्षल हनुमंते, ओंकार जाधव, दत्ता कोळी, निखिल मालुसरे, मंडळ अधिकारी जांभळे, निखिल जांभळे

आकर्षक रोषणाईने चौक बाजारपेठ सजली आहे. तर सभा मंडपात लोकमान्य टिळक आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तसबिरी लावण्यात आल्या आहेत.



# गौरीला ओवसा देण्यासाठी पारंपरिक सुपांना मागणी वाढली

**पनवेल : वार्ताहर**

गणरायापाठोपाठ येणाऱ्या गौरीला ओवसा देण्यासाठी पारंपरिक सुपांना मागणी वाढलेली दिसते. बांबूपासून बनवलेले सूप भाऊ हा गौरी गणपतीत बहिणीसाठी नेतो आणि बहीण त्याचा पाहुणचार करते, तर काही ठिकाणी नवीन नवरीला पाच सुपांचा ओवसा देण्याची पद्धत रूढ आहे.

सुपात फळे, वेगवेगळी फुले, दुर्वा, तुळस, आघाडा, पोळ्या, करंजी आदी साहित्याचा ओवसा गौरीला दिला जातो. या वेळी भाऊ बहिणीला साडीचोळी, बांगडीसाठी पैसे देतो. मग साजशृंगार, सौभाग्याचे लेणे परिधान करून महिला पतीच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करून गौरीची ओटी भरतात. येत्या रविवारी गौरीचे आगमन व सोमवारी पूजन असल्याने बाजारात सुपांना मागणी आहे. बुरूड समाजाच्या वतीने गणेशोत्सवातील गौरी पूजनासाठी सूप बनविले जातात. उत्सवापूर्वी सूप बनविण्याच्या प्रक्रियेस सुरुवात केली जाते.

बाजारात सध्या बांबूपासून बनविण्यात येत असलेल्या सुपाचा १५० ते २०० रुपये असा दर आहे. सध्या पनवेल पंचक्रोशीत सातारा जिल्ह्यातील सूप बनविणारे कारागीर आले आहेत. येथील शेतकरी व बागायतदारांकडून बांबू खरेदी करून सूप बनविण्याची कला ते उपयुक्तपणे साकारतात.

# बेणसे गावच्या अनिल पाटील यांच्या निवासस्थानी गणपतीसाठी आई एकविरा मंदिराचा हुबेहूब देखावा

**पाली : प्रतिनिधी**

रायगडसह कोकणात गणेशोत्सवाची धामधूम सुरू आहे. उत्साह, नवचैतन्य व मंगलमय वातावरणात अधिक भर पडली आहे ती म्हणजे पर्यावरणपूरक व निसर्गरम्य मनमोहक देखाव्यांनी. बेणसे गावी सालाबादप्रमाणे अनिल पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या बाप्पाच्या साथीला अतिशय सुंदर व हुबेहूब असा कार्ला येथील आई एकविरा मंदिराचा मनमोहक देखावा साकारण्यात आलाय. महाराष्ट्रातील प्रसिद्ध देवस्थानांमध्ये कार्ला येथील एकवीरा देवस्थानचा समावेश



आहे.येथील शिल्पकला व प्राचीन लेण्यांचा उत्तम नमुना साकारण्याची किमया अनिल पाटील व कुटुंबातील तरुणांनी एकत्र येऊन केली आहे. शिल्पकला आणि लेणी कलेचा उत्तम नमुना म्हणजे लोणावळ्याजवळील वेहेरगाव येथील कार्ला लेणी! पुणे–मुंबई या दोन महानगरांच्या मध्यभागी विपुल निसर्गसंपदा, प्राचीन व ऐतिहासिक लेण्या व गड–किल्ले, भरपूर जलसाठा अशा विविधतेने नटलेल्या मावळ तालुक्याच्या वैभवात भर टाकणारी कार्ला लेणी व श्री एकवीरा मातेचे मंदिर आहे. याच स्वरूपाची प्रतिकृती पाटील कुटुंबीयांनी मोठ्या मेहनतीने साकारली आहे. त्यामुळे पाटील कुटुंबियांचे दर्शनासाठी येणाऱ्या नातेवाईक, गणेशभक्त यांच्याकडून कौतुक होत आहे.

पाटील कुटुंबिय दरवर्षी एकत्रित येऊन गणरायाची मोठ्या भक्तिभावाने प्रतिष्ठापना करतात. दरवर्षी ते पर्यावरणपूरक, निसर्गपूजक, जनजागृती व प्रबोधन घडवून आणणारे वैशिष्ट्य पूर्ण देखावे तयार करतात. यावर्षी अनिल पाटील यांच्या संकल्पनेतून कार्ला येथील आई एकविरा देवीच्या मंदिराची हुबेहूब प्रतिकृती साकारली आहे. हा देखावा पाहून अनेकजण भारावून जात आहेत, आम्हाला गणरायाबरोबरच आई एकविरा मातेचे दर्शन इथं झाल्याचे समाधान मिळत असल्याचे भाविक सांगतायेत.

# आकुर्लीमध्ये गॅरेजला आग



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील आकुर्ली या ठिकाणी असलेल्या एका गॅरेजला रविवारी लागलेल्या आगीत मोठ्या प्रमाणात वाहनांचे नुकसान झाल्याची माहिती मिळाली.

पनवेल तालुक्यातील आकुर्ली साई सज्ञ निवास बिल्डिंग जवळ असलेल्या एका गॅरेजला अचानकपणे आग लागल्याने तेथे असलेल्या विविध प्रकारच्या वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. या आगीची माहिती मिळताच त्वरित नागरिकांनी अग्निशमन दलासह स्थानिक पोलिसांना कळवले. तात्काळ पनवेल महानगरपालिकेचे अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल आग वीझवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. आग कश्यामुळे लागली याचे कारण अद्याप कळले नाही मात्र गॅरेजचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याची माहिती मिळाली आहे.

# जेएनपीए–गव्हाणफाटा महामार्गावर अवजड कंटेनर वाहतूक कोंडी

**उरण : प्रतिनिधी**

राज्यातील मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जेएनपीए बंदरातून हजारोच्या संख्येने अवजड कंटेनर वाहने अडकून पडली होती. जेएनपीए बंदर ते करळ उड्डाणपूलासह द्रोणागिरी औद्योगिक परिसरातील धुतुम, चिर्ले ते गव्हाणफाटा या दहा किलोमीटर लांबीच्या महामार्गावर अवजड कंटेनर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

या वाहतूक कोंडीमुळे उरण व चिरनेर, कोप्रोली विभागातील जाणारी अनेक प्रवासी वाहने तासंतास अडकून पडली होती. त्यामुळे प्रवाशांचाही खोळंबा झाला होता. कोसळत्या पावसात सर्वच वाहनचालकांना अडकून राहिल्याने कोणत्याही सुविधापासून खाण्यापिण्याचेही हाल सोसावे लागल्याने चालकही हैराण झाले होते.

ही वाहतूक कोंडी सुरळीत करण्यासाठी उरण वाहतूक पोलिसांचे शर्तीचे प्रयत्न सुरू होते. यामध्ये पनवेल, नवी मुंबई, पुणे व गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या अवजड कंटेनर वाहनांच्या महामार्गावर तीन – तीन रांगा लागल्या होत्या. शर्तीच्या प्रयत्नातून यामधील एक रांग सुरू करण्यात उरण वाहतूक पोलिसांना यश आले.

त्यानंतर काही प्रमाणात वाहतूक सुरू झाल्याची माहिती उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी दिली आहे.

दरम्यान, जेएनपीए तील सिंगापूर बंदराच्या वाहतुकीवर परिणाम झाला. करळ उड्डाणपूलावरून मुंबई पुणे व गोवा कोकणाच्या दिशेने जाणारी वाहने अडकून पडली. करळ ते जासई महामार्गही मंदावला.

याशिवाय दास्तान फाट्यावरही मोठी वाहतूक कोंडी होऊन वाहतूक पूर्णतः ठप्प झाली होती.

# पनवेल बस स्थानकाजवळील इमारतीत आढळली सापाची १४ अंडी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल बस स्थानकाजवळील एका इमारतीत साप असल्याचे विक्रम कैया यांनी नेचर फ्रेण्ड सोसायटी या संस्थेचे कार्यकर्ते शार्दुल वारंगे यांना कळवले, मात्र या इमारतीत साप न सापडता, सापाची १४ अंडी आढळली.

वनविभागाच्या मार्गदर्शनानुसार नेचर फ्रेण्ड सोसायटी या संस्थेच्या प्रथमोपचार व पुनर्वसन केंद्रात पुढील प्रक्रियेसाठी ही अंडी आणली. या अंड्यांतून १५ ते २३ ऑगस्ट २०२५ या कालावधीमध्ये धामण या सापाची ११ पिल्ले व्यवस्थित बाहेर आली. या पिल्लांना २५ ऑगस्ट २०२५ रोजी वनविभागच्या मार्गदर्शनानुसार संस्थेचे अध्यक्ष संतोष उदरे, कार्यकर्ते बाबू शेख, आर्यन उदरे व वनरक्षक अमोल लाड यांच्या समक्ष निसर्गात सोडून देण्यात आले.

**धामण साप बिनविषारी असून तो शेतकऱ्यांचा मित्र आहे. शेतीतील उंदीर, घुशी आणि इतर उपद्रवी प्राणी खाऊन पिकांचे संरक्षण करतो. या सापाच्या मदतीने शेतकरी प्राण्यांचा बंदोबस्त न करता पिकांचे नुकसान टाळू शकतात, त्यामुळे तो शेतीसाठी एक मौल्यवान सहयोगी आहे.**

**–संतोष उदरे**





भाजप : केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह व भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जे.पी नड्डा यांच्या कुटुंबियांनी गणेशोत्सवानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी भेट दिली. विराजमान गणरायाचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे फडणवीस कुटुंबीयांनी स्वागत केले.



खोपोली: भारतीय जनता पक्षाचे युवा नेते विक्रम साबळे यांनी खोपोली शहरातील विविध भागातील सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांना भेटी देऊन दर्शन घेतले.

# राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्थेतर्फे क्रीडा दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था, प्रादेशिक केंद्र, नवी मुंबई येथे राष्ट्रीय क्रीडा दिन शुक्रवार २९ सप्टेंबर २०२५ साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय क्रीडा दिन दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी भारतात साजरा केला जातो. हा दिवस हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. त्यांच्या खेळामुळे भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठा सन्मान मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे प्रभारी अधिकारी डॉ. रवी प्रकाश सिंह यांच्या स्वागतपर भाषणाने झाली.



या कार्यक्रमाला विशेष पाहुणे म्हणून ब्रायडन रॉड्रिग्स व जोआन रॉड्रिग्स उपस्थित होते. संस्थेमध्ये या दिवशी विशेष मुलांसाठी विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. त्यात टेबल टेनिस, स्पीड वॉकिंग आणि मजेदार खेळ यांचा समावेश होता. विजेत्यांना पारितोषिक वितरण समारंभात सन्मानित करण्यात आले.तसेच विद्यार्थ्यांसाठी क्रीडा प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली.

राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था नवी मुंबईचे सर्वसमावेशकता व प्रत्येक मुलाच्या विविध क्षमतांचा सन्मान करण्याचे ध्येय अधोरेखित झाले.

# गणेशोत्सवात फळांची मागणी वाढली

**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सवात फळांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पनवेल घाऊक फळ बाजारात फळांची आवक ३० ते ४० टक्क्यांनी वाढली असून, त्यात सफरचंद, डाळिंब, संत्री, मोसंबी, पेरू, चिकू, सीताफळ, पेर आणि ड्रॅगनफ्रुटसारख्या फळांना अधिक मागणी आहे. या फळांचे दरही वधारले आहेत. मागणी असल्याने सध्या या फळांची आवक चार ते पाच हजार क्विंटलच्या घरात गेली आहे.

घाऊक फळ बाजारात सध्या डाळिंब एक हजार क्विंटल, मोसंबी दीड हजार क्विंटल, तर संत्र्याची दोनशे ते तीनशे क्विंटल इतकी आवक, सीताफळांची दोनशे क्विंटल आवक होत आहे. गेल्या कित्येक दिवसांपासून फळ बाजारातील वातावरण शांत होते, मात्र गणेशोत्सवामुळे बाजाराला काही प्रमाणात उभारी मिळाली आहे. ड्रॅगनफ्रुट ५० क्विंटल याशिवाय इतर पावसाळी फळे पेर, नासपती, सीताफळ या फळांचीही दोनशे ते तीनशे क्विंटल इतकी आवक आहे. बाजारात एकीकडे आवक वाढली असली, तरी दुसरीकडे फळांचे किरकोळ बाजारातील दर मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. देवाच्या दर्शनासाठी फळे घेऊन जाण्याची पद्धत आहे. त्यामुळे फळांना मागणी वाढली असल्याचे व्यापारी सांगत आहेत. यामुळे किरकोळ बाजारात मात्र या फळांचे दर वाढलेले पाहायला मिळत आहेत.

एपीएमसी बाजारात सफरचंद ८० रुपयांपासून १५० रुपयांपर्यंत किलो झाले आहेत. डाळिंबही ८० ते १६० रुपये किलो, सीताफळ ६० ते ९० रुपयांपर्यंत आहे. पेरू २५ ते ५० रुपये किलो, मोसंबी २५ ते ५० रुपये किलो, ड्रगनफ्रुट १०० ते १५० रुपये किलोवर गेले आहेत. गणेशोत्सव संपेपर्यंत फळांचे दर असेच वाढीव राहणार असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.



आमदार प्रवीणभाऊ दरेकर घरच्या बाप्पाचे भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी दर्शन घेतले.









पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, भाजप उत्तर भारतीय मोर्चा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष संतोष शर्मा, भाजप खारघर शहर मंडळ सरचिटणीस दीपक शिंदे, प्रभाग ५ अध्यक्ष अजय माळी, खारघर शहर कार्यकारिणी सचिव स्नेहल बोढाई, राजेंद्र मांजरेकर, अमित बोढाई, संदीप कासार, मंजुळ शुक्ला, उत्तर भारतीय उलवे अध्यक्ष मनोज विश्वकर्मा, सुनील मोर्या, मनोज मोर्या, अखिलेश विश्वकर्मा, किशोर पाटील, मनिष सिंग, संजय म्हात्रे, पुरण पाटील, जीवन गावड, गोपी शेठ म्हात्रे, अजित जोशी, दीपक म्हात्रे, परेश पाटील, सागर रंधवे, अजून रजाने सीनियर पीआय उलवे संजय पाटील, नरेश पाटील, विजेंद्र पाटील, हेमंत ठाकूर, सुहास भगत, योगिता भगत, सुधीर ठाकूर विजय घरात, जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, सीमा घरत, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, राजश्री वावेकर, माजी उपमहापौर चारुशीला घरत, पांडुरंग घरत, प्रमोद भिंगारकर आदींनी दर्शन घेतले.













पनवेल : भाजप उत्तर भारतीय मोर्चा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षपदी फेरनियुक्ती झाल्याबद्दल संतोष शर्मा यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप खारघर शहर मंडळ सरचिटणीस दीपक शिंदे, प्रभाग ५ अध्यक्ष अजय माळी, खारघर शहर कार्यकारिणी सचिव स्नेहल बोढाई, राजेंद्र मांजरेकर, अमित बोढाई, संदीप कासार, मंजुळ शुक्ला, उत्तर भारतीय उलवे अध्यक्ष मनोज विश्वकर्मा, सुनील मोर्या, मनोज मोर्या, अखिलेश विश्वकर्मा, किशोर पाटील, मनिष सिंग उपस्थित होते.



विनायक जोशी, रिस, ता. खालापूर



पनवेल : कानपोली येथील बालाजी रेसिडेन्सी कॉम्प्लेक्स बिल्डिंग १ आणि २ मधील बाप्पा.





पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गणेशोत्सवानिमित्त उलवे येथील श्री सार्वजनिक गणेश मंडळ सेक्टर २० तसेच कामगार नेते महेंद्र घरत यांच्या घरातील विराजमान गणरायाचे दर्शन घेतले. सोबत भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी.देशमुख व इतर.

## गणेशोत्सवात धरणा कॅम्प गावात भजनाची परंपरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणपती म्हणजे विद्येची देवता घरी आल्यापासून घरामध्ये मांगल्याचे पवित्र वातावरण निर्माण झाल्यांचे पहावयांस मिळत आहे. दिड दिवसांचे गणपतीचे विसर्जन झाले. आता सात दिवसांचे गणपती गावामध्ये असल्यामुळे अनेक ठिकाणी सायंकाळी भजनांचे स्वर व आरतीचे स्वर कानी पडत आहेत. सर्वत्र जणु बाप्पाचा गजर ऐकण्यास मिळत आहे. आपल्याकडून गणपतीची सेवा व्हावी या माध्यमातून धरणा कॅम्प गावातील ग्रामस्थांकडून गणपती उत्सवात भजनाचे स्वर व युवा ग्रामस्थांकडून आरतीचे स्वर रोज गुंजतांना दिसत आहेत.

ज्या ठिकाणी गणपतीची स्थापना झाली आहे त्या ठिकाणी भजन हे होतच असतात. विशेष म्हणजे पनवेल तालुक्यातील धरणा कॅम्प गावातील ज्येष्ठ ग्रामस्थ हे भजनाकडे अग्रेसर असल्याने त्यांच्यासोबत तरुण मंडळी व भाविकदेखील भजनाकडे तसेच दररोज आरतीकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होताना दिसत आहेत. नवीन चालीनुसार आरती ऐकण्यास आनंद मिळत असल्यामुळे धरणाकॅम्प गावातील भाविक हे मंजूळ स्वर ऐकण्यास आनंदी झाल्याने एकरुप होत आहेत. सात दिवस आपल्या मुखातून गणेशांचे स्वर बाहेर पडावे, त्याचबरोबर गणेशाची सेवा घडावी हाच या मागील उद्देश असल्याचे ज्येष्ठ व तरुण नागरिकांनी मनोगत व्यक्त केले आहे.





पनवेल : दैनिक युवक आधार या वृत्तपत्राचा दुसरा वर्धापन दिन ७ सप्टेंबर रोजी शगुन बँक्वेट हॉल, नवीन पनवेल येथे मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या सोहळ्याचे निमंत्रण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, लोकनेते 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, तसेच माजी नगरसेवक संदीप पाटील यांना देण्यात आले. या वेळी युवक आधारचे संपादक संतोष शिवदास आमले, सहसंपादक मुकुंद कांबळे, उपसंपादक विलास गायकवाड, नियोजन समिती अध्यक्ष गोरक्ष झोडगे, सदस्य मच्छिंद्र पाटील, जगदीश क्षीरसागर तसेच नियोजन समिती सदस्य व सोशल मीडिया संयोजक प्रसाद हनुमंते उपस्थित होते.



कृष्णा एस रमण-हिंदू कॉलनी, म्हातवली उरण



धनेश्वर म्हात्रे खोपटे-उरण

## संपादकीय

# आली गौराई...

महाराष्ट्रात सध्या गणेशोत्सवाची धूम आहे. राज्यातील हा सर्वात मोठा उत्सव आबालवृद्ध हर्षोल्हासाने साजरा करतात. गणरायापाठोपाठ आता गौरीचेही आगमन झाल्याने सर्वांचा आनंद द्विगुणित झाला असून विशेषतः महिलावर्ग सुखावल्याचे चित्र आहे. एरवी कामाच्या धबडग्यात असलेल्या महिलांना यानिमित्ताने दोन घटका गौराईच्या सेवेची पर्वणी मिळालीय...

**गणेशोत्सवात गौरीचे एक वेगळे महत्त्व असून त्याला भावनिक किनारही आहे. गणपती बाप्पा ज्या घरात विराजमान होतात, तिथे गौरीचे आगमन विशेष आनंद, मंगलकारकता आणि सौभाग्याचे प्रतीक मानले जाते. गौरी ही देवी पार्वतीचेच रूप म्हटले जाते. पार्वती म्हणजेच सौंदर्य, सृजनशक्ती आणि गृहलक्ष्मी. तिचे घरात आगमन झाले की घरात सुख, शांती व समाधान नांदते, असे सांगितले जाते. गौरी पूजनाच्या दिवशी घरातील स्त्रिया विशेष साजश्रृंगार करून पूजा करतात, जे कौटुंबिक नातेसंबंध अधिक घट्ट करण्याचे काम करतात. गौरीला महालक्ष्मीचे स्वरूपही मानले जाते. त्यामुळे त्या घरात सुख-समृद्धी, धनधान्य आणि सौंदर्य यांचे आगमन होते. गणपतीच्या उत्सवात गौरी आगमन हा स्त्रियांसाठी खास मानला जाणारा सोहळा आहे. नवविवाहित स्त्रिया पहिल्यांदा माहेरी आल्या की गौरी पूजनाची प्रथा विशेष आनंदाने केली जाते. जसे गणपतीला विघ्नहर्ता मानले जाते तसे गौरीला गृहलक्ष्मी मानले जाते. या दोघांचे एकत्र पूजन म्हणजे जीवनातील विघ्ने दूर होऊन समृद्धी आणि शांती प्राप्त होते अशी भाविकांची श्रद्धा आहे. गणेशोत्सव हा आनंदोत्सव असला तरी गौरी पूजनामुळे तो अधिक आध्यात्मिक व सांस्कृतिक बनतो. यामध्ये प्राचीन परंपरेचे जतन दिसून येते. यामागची पौराणिक कथा अशी की, फार पूर्वी दानवांचे राज्य होते. दानव हे देवांना फार त्रास देत असत. सर्व देवांच्या स्त्रियांना यामुळे आपल्या सौभाग्याची चिंता वाटू लागली. म्हणून सर्व देवांच्या स्त्रियांनी एकत्र जमून महालक्ष्मीची मनोभावे पूजा व प्रार्थना केली. महालक्ष्मी प्रसन्न झाली व त्यांच्यावर आलेले संकट तिने टाळले. या प्रसंगाची आठवण म्हणून हा सण तीन दिवस साजरा केला जातो. गणेशोत्सवात पुरुष प्रामुख्याने पूजा करतात, परंतु गौरीपूजनाचा सण हा स्त्रियांचा म्हणून ओळखला जातो. घरातील स्त्रिया हळदीकुंकवाने एकमेकींशी मैत्री दृढ करतात. यामुळे समाजात स्त्रियांचे सांस्कृतिक व सामाजिक एकत्रिकरण घडते. याचे लोकजीवनातील महत्त्व असे की ग्रामीण भागात गौरीला अन्नधान्याची देवी मानतात. शेतकरी पीक चांगले यावे यासाठी गौरीचे पूजन करतात. शहरी भागात गौरी आगमनाचा दिवस म्हणजे स्त्रियांचा आनंद, उत्साह व नटणे-थटणे याचा सण असतो. कोकणात नववधूकडील मंडळी ओवशाची वाट पाहतात. ओवसा म्हणजे सुपात फळे, पदार्थ, नवी साडी-चोळी लेवून नववधू ते सूप डोक्यावर घेऊन गौरीचे पूजन झाले की समोर धरून वरून खाली अशा प्रकारे पाच वेळा करते, याला सूप ओवसणे (ओवाळणे) म्हणतात. थोडक्यात सांगायचे तर गणपती म्हणजे विघ्नांचा नाश आणि गौरीचे आगमन म्हणजे घरात लक्ष्मीचे आगमन. त्यामुळे या दोघांच्या संगतीने घरात सुख, शांती, ऐश्वर्य आणि आनंद नांदतो अशी श्रद्धा आहे. अशा प्रकारे माता आणि पुत्र यांची भेट आता होणार आहे. तेव्हा संपूर्ण घर अत्यानंदून जाईल. देवीचे यथासांग पूजन केले जाईल, नैवेद्य दाखवण्यात येईल आणि नाचून गाऊन सारे आनंद व्यक्त करतील असा हा अवर्णनीय सोहळा आहे.**

# गुणवत्तापूर्ण शिक्षणव्यवस्था लोकाभिमुख करण्यावर भर!

शिक्षण हे समाजाच्या सर्वांगीण विकासाचे आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ आहे. शिक्षणामुळे केवळ ज्ञानसंपादन होत नाही तर आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक स्वावलंबनाची वाट खुली होते. म्हणूनच शासनाने शिक्षण सर्वांसाठी हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक घटकातील विद्यार्थ्यांना समान संधी देण्यासाठी राज्य शासनाने विविध योजना आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. शिक्षण हे केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. आजच्या युगात शिक्षण व्यवस्थेला विद्यार्थ्यांच्या गरजा, स्वप्ने आणि क्षमतांशी जोडणे ही काळाची गरज आहे. या जाणिवेतून शासनाने शिक्षण व्यवस्था लोकाभिमुख करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलली आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधन वृत्तीला आणि कौशल्यविकासाला चालना देणारे उपक्रम राबवले जात आहेत.

राज्य शासनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. राज्यात २६ फेब्रुवारी २०२४पासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग आरक्षणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आली. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी तसेच शासकीय सेवांमधील सरळसेवेसाठी १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. यानंतर न्यायमूर्ती शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी जातीचे म्हणजेच इतर मागासवर्ग प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाले आहे, मात्र या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना जात वैधता प्रमाणपत्र तातडीने न मिळाल्याने प्रवेश प्रक्रियेत अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर शासनाने अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशांकरिता एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सुरुवातीला सहा महिने, त्यानंतर तीन महिन्यांची मुदतवाढ दिली होती. तरीदेखील काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवण्यास अडचणी येत आल्याचे निदर्शनास आले. याची राज्य शासनाने दखल घेऊन पुन्हा तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ दिली आहे.

याशिवाय सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग व ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे प्रवेश जातवैधता प्रमाणपत्रांच्या अभावी त्यांचे प्रवेश रद्द होणार नाहीत आणि शैक्षणिक नुकसान टळणार आहे.

**डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना**

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. ही योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत डॉ. पंजाबराव देशमुख सारथी देशांतर्गत उच्च शिक्षण शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३पासून राबविण्यात येत आहे. यामध्ये मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा आणि कुणबी-जातीच्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाने सुरु केलेली ही योजना विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. सन २०२२-२३पासून या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक पाठबळ मिळू लागले असून उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढत असून शिक्षणाचा दर्जा वाढविण्यास मदत होत आहे.

या योजनेंतर्गत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना देशांतर्गत उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. विद्यार्थ्यांना केवळ शुल्क सहाय्यच नव्हे, तर वसतिगृह, पुस्तके, अभ्यास साहित्य, प्रवास भत्ता आदी विविध सुविधा पुरवल्या जातात. यामुळे मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा व कुणबी जातीतील गरीब व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन. आणि आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात उभे करण्यासाठी शैक्षणिक मदत होऊन उच्च व तांत्रिक शिक्षण घेताना होणारा आर्थिक खर्चही कमी होतो त्यामुळे उच्च शिक्षणात विद्यार्थांचे प्रमाण वाढते.

**छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती**

मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी लक्षित गटातील पीएच.डी. करणाऱ्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्तीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहन देण्याकरिता सन २०१९ या वर्षापासून छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती सुरु करण्यात आली आहे. या अधिछात्रवृत्ती अंतर्गत लक्षित गटातील ३०७८ विद्यार्थ्यांना सारथी संस्थेद्वारे सन २०२३पर्यंत अधिछात्रवृत्ती मंजूर करण्यात आली आहे. आज रोजीपर्यंत ३९३ विद्यार्थ्यांची पीएचडी पूर्ण झाली असून ११० विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी नोकरी लागली आहे. या विद्यार्थ्यांपैकी २३ विद्यार्थ्यांना त्यांच्या संशोधन विषयात पेटंट मिळाला आहे.

**विद्यार्थ्यांना देण्यात येणारी विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अधिछात्रवृत्ती**

जेआरएफप्रमाणे (प्रथम ०२ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती युजीसी निकषानुसार पाच लाख ५३ हजार ३००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ४६ हजार १०८ आहे. जेआरएफप्रमाणे (२ वर्षानंतर पुढील ०३ वर्ष) एकूण प्रती वर्ष रक्कम अधिछात्रवृत्ती ६ लाख २९ हजार ८००, एकूण प्रती माह अधिछात्रवृत्ती ५२ हजार ४८३ देण्यात येते. अधिछात्रवृत्ती अंतर्गत अंतिमरित्या निवड झालेल्या उमेदवारांना आर्थिक सहाय्य हे सारथीकडून ज्या रोजी अवार्ड लेटर दिले जाईल, त्या तारखेपासून पुढे पीएच.डी. करिता पाच वर्ष किंवा उमेदवार संशोधनासाठी विद्यापीठ महाविद्यालय/संस्था येथे रुजू झालेला असेल. (विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेच्या अहवालातील नमूद रुजू तारीख), या वेळी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून उमेदवाराच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी पीएचडीच्या फक्त उर्वरित कालावधीसाठी एकूण पाच वर्षांच्या कालावधीच्या आधारे किंवा उमेदवारांनी ज्या तारखेस संशोधन अहवाल सादर केला असेल, यापैकी जी अगोदरची तारीख असेल त्या तारखेपर्यंत अनुज्ञेय राहील. निवड झालेल्या लाभार्थ्यांना रकमेसंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाप्रमाणे अंतर्गत होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती अनुज्ञेय राहील.

अधिछात्रवृत्ती योजनेंतर्गत सन २०१९मध्ये पात्र विद्यार्थी ५०३, पीएचडी घेतलेले विद्यार्थी २४६, नोकरी लागलेले विद्यार्थी ७४ आहेत. सन २०२०मध्ये पात्र विद्यार्थी २०४, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ८०, नोकरी लागलेले विद्यार्थी १८ आहेत. सन २०२१मध्ये पात्र विद्यार्थी ५५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ६४, नोकरी लागलेले विद्यार्थी १० आहेत. सन २०२२मध्ये पात्र विद्यार्थी ८५१, पीएचडी घेतलेले विद्यार्थी ४, नोकरी लागलेली विद्यार्थी १ आहेत, तर सन २०२३मध्ये पात्र विद्यार्थी ९६९ आहेत.

परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या जातीच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची गुणवत्ता असून आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी जातीतील मुला मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी परदेशी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी/पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी क्यूएस वर्ल्ड रँकिंगमध्ये २००च्या आत रँकिंग असलेल्या शैक्षणिक संस्था/विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतील अशा मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रवर्गातील एकत्रितपणे ७५ विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. ही योजना छत्रपती शाहू महाराज व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या शासनाच्या संस्थेमार्फत सयाजीराव गायकवाड-सारथी गुणवंत मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना या नावाने शैक्षणिक वर्ष २०२३-२४पासून राबविण्यात येत आहे.

सारथी संस्थेमार्फत राज्यातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा या लक्षित गटातील विद्यार्थ्यांकरिता डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती सन २०२२-२३पासून २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशित पात्र विद्याध्यर्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील मराठा, कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता प्राप्त २०० शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा पात्र ३०० विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी देशांतर्गत शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

**-काशीबाई थोरात-धायगुडे, विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई**



## बदलते तंत्रज्ञान

### सॅमसंगच्या ५जी फोनची बाजारात एन्ट्री! फिचर्स पहा..

कमी किंमतीत चांगले फीचर्स असलेल्या फोनच्या शोधात असलेल्या ग्राहकांसाठी चांगली बातमी आहे. सॅमसंगने त्यांचा नवा फोन सॅमसंग ए१७ ५जी लॉन्च केला आहे, ज्याची सुरुवाती किंमत २० हजारांपेक्षा कमी आहे. हा फोन गुगलच्या जेमिनी एआय असिस्टंट आणि सर्कल टू सर्च फीचरसह लॉन्च झाला आहे तसेच हा फोन अँड्रॉइड १५वर चालतो.




सॅमसंग गॅलेक्सी ए१७ ५जीच्या ६जीबी रॅम + १२८ जीबी स्टोरेज असलेल्या व्हेरिएंट किंमत १८ हजार ९९९ रुपये आहे, तर ८जीबी रॅम + १२८ जीबी स्टोरेज व्हेरिएंट किंमत २० हजार ४९९ रुपये आहे आणि ८जीबी + २५६ जीबी व्हेरिएंटची किंमत २३ हजार ४९९ रुपये इतकी आहे. हा फोन ब्लॅक, ब्लू आणि ग्रे अशा तीन रंगांमध्ये उपलब्ध आहे. हा फोन सॅमसंग इंडिया ई-स्टोअर, अमेझॉन आणि फ्लिपकार्टवरून खरेदी करू शकतात. एसबीआय आणि एचडीएफसी बँकेच्या क्रेडिटवरून हा फोन खरेदी केल्यास ग्राहकांना १००० रुपयांची सूट मिळत आहे.

सॅमसंग गॅलेक्सी ए१७ ५जी हा फोन ड्युअल-सिम सपोर्टसह येतो आणि त्यात ६.७-इंचाचा फुल-एचडी प्लस इन्फिनिटी-यू सुपर एमोलेड डिस्प्ले आहे, ज्याचा रिफ्रेश रेट ९० हर्ट्झ आहे. या फोनमध्ये ट्रिपल रिअर कॅमेरा सेटअप मिळतो, ज्यात ५० मेगापिक्सेलचा प्रायमरी सेन्सर, ५ मेगापिक्सेलचा अल्ट्रावाइड सेन्सर आणि २ मेगापिक्सेलचा मॅक्रो लेन्सचा समावेश आहे. सेल्फी आणि व्हिडीओ कॉलिंगसाठी १३ मेगापिक्सेलचा कॅमेरा मिळतो. सॅमसंगने गॅलेक्सी ए१७ ५जीमध्ये ५००० एमएएच क्षमतेची बॅटरी दिली आहे, जी २५ व्हॉल्ट वायर्ड फास्ट चार्जिंगला सपोर्ट करते.

फोनमध्ये ऑक्टा-कोर इन-हाऊस एक्सिनोस १३३० चिपसेट आहे. हा फोन सहा वर्षांसाठी ओएस अपग्रेड आणि सुरक्षा अपडेटसाठी पात्र आहे. कनेक्टिव्हिटीसाठी फोनमध्ये ५जी, ४जी VoLTE, Wi-Fi ५, ब्लूटूथ ५.३, GPS, NFC, OTG आणि USB टाइप-C पोर्ट मिळते. सुरक्षिततेसाठी, त्यात साइड-माउंटेड फिंगरप्रिंट सेन्सर देण्यात आले आहे. धूळ आणि पाण्यापासून संरक्षित करण्यासाठी फोनला आयपी ५४ रेटिंग मिळाले आहे.

# भारत गायन समाज संस्थेची स्थापना

हिंदुस्थानी संगीताच्या प्रसार-प्रचारार्थ आणि संगीतप्रशिक्षण यासाठी कार्यरत असलेली एक जुनी संगीतसंस्था म्हणून भारत गायन समाज संस्था ओळखली जाते. गायनाचार्य भास्करबुवा बखले यांनी जिज्ञासूंना सहज संगीत शिकता यावे या हेतूने १ सप्टेंबर १९११ रोजी या संस्थेची स्थापन केली. किर्लोस्कर संगीत नाटक मंडळींचा या संस्थेस पाठिंबा असल्याने संस्थेचे नामकरण 'किर्लोस्कर भारत गायन समाज' असे करण्यात आले. कालांतराने ते 'भारत गायन समाज' असे झाले. भास्करबुवांच्या निधनानंतर (१९२२) दत्तोपंत बागलकोटकर, बापूराव केतकर, शंकरराव अष्टेकर, गोविंदराव टेंबे, बालगंधर्व, ताराबाई शिरोडकर, मास्तर कृष्णराव प्रभृतींनी व त्यांच्या शिष्यांनी हे कार्य नेटाने पुढे चालू ठेवले.




## निमित्त

संस्थेने १९२८मध्ये पुण्यात शनिपार, शुक्रवार पेठ येथे वास्तू खरेदी केली. 'भास्कर संगीत विद्यालय' ही शिक्षण शाखा १९४५ साली येथे सुरू झाली. मास्तर कृष्णराव यांनी या संस्थेचा दहा वर्षांचा अभ्यासक्रम तयार केला. पुढे पुण्यातील एक जुनी संस्था 'पुणे गायन समाज' आणि 'भारत गायन समाज' या संस्थांचे विलीनीकरण होऊन १९४१मध्ये 'पुणे भारत गायन समाज' ही संस्था अस्तित्वात आली.


संस्थेच्या भास्कर संगीत विद्यालयामध्ये हिंदुस्थानी अभिजात संगीत तसेच हार्मोनियम, तबला, व्हायोलिन, सतार ही वाद्ये आणि भरतनाट्यम् व कथ्थक या नृत्यप्रकारांचे शिक्षण दिले जाते. दरवर्षी अभ्यासक्रमानुसार एप्रिल आणि डिसेंबर या महिन्यांत परीक्षा घेतल्या जातात. दहा वर्षांच्या या अभ्यासक्रमामध्ये तीन वर्षांनंतर संगीत मध्यमा, पाचव्या वर्षी संगीत कुशल, सातव्या वर्षी संगीत विशारद आणि दहाव्या वर्षी संगीत पारंगत ही प्रमाणपत्रे दिली जातात. संस्थेच्या अभ्यासक्रमास १९६२मध्ये राज्य शासनाकडून मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे इतरही संलग्न संगीत महाविद्यालयांमध्ये हा अभ्यासक्रम शिकविला जातो.

भास्कर संगीत विद्यालयाने संगीत अभ्यासकांकरिता भास्कर संगीत प्रवेशिका, राग संग्रह (खंड १ ते ३), हार्मोनियम प्रवेश (खंड १ ते ३), तबलावादन प्रवेश (खंड १ व २), ताल साधना (खंड १ व २) आणि तालविज्ञान या पुस्तकांची निर्मिती केली आहे. संस्थेमध्ये संगीतविषयक अनेक पुस्तकांचे सुसज्ज ग्रंथालय आहे तसेच जुन्या पिढीतील अनेक ख्यातकीर्त संगीत कलाकारांच्या ध्वनिमुद्रिकांचे जतन करण्यात आलेले आहे. भास्करबुवांच्या १३१व्या जयंतीनिमित्त टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे ऑक्टोबर २०००मध्ये भव्य समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास भीमसेन जोशी, नौशाद अली इत्यादी मान्यवरांच्या हस्ते प्रतिष्ठित पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. याचवर्षी पं. भास्करबुवा यांनी रचलेल्या गाण्यांसह संगीत स्वयंवर या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला.

संस्थेतर्फे हिंदुस्थानी अभिजात संगीताबरोबरच प्रामुख्याने नाट्यसंगीतही तरुण गायकांवर बिंबवणे आणि नाट्यसंगीत पुढच्या पिढीपर्यंत पोहचावे या उद्देशाने १९६८पासून बालगंधर्व नाट्यसंगीत स्पर्धा भरविली जाते. भास्करबुवांच्या तिसऱ्या आणि चौथ्या पिढीतील आप्तमंडळींनी संस्थेची परंपरा नेटाने पुढे सुरू ठेवली आहे.

**-सु.र. देशपांडे (मराठी विश्वकोष)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### रोज रात्री छोटीशी लवंग खाणे फायद्याचे

लवंग एक असा मसाला आहे, ज्याचा वापर किचनमध्ये वेगवेगळ्या गोष्टींसाठी केला जातो, ज्यामुळे पदार्थांची टेस्ट वाढते. सोबतच लवंग शरीरालाही फायदे देते. खासकरून रात्री लवंग खाण्याचे अनेक फायदे मिळतात. अमेरिकेतील प्रसिद्ध डॉ. एरिक बर्ग यांनी रात्री लवंग खाण्याचे फायदे सांगितले आहेत.



डॉक्टरांनी यूट्यूब चॅनलवर याबाबत एक व्हिडीओ पोस्ट केला आहे, ज्यात ते सांगतात की, छोटीशी लवंग आरोग्यासाठी रामबाण उपायासारखी काम करते. खासकरून रात्री लवंग खाणं किंवा तिचं पाणी पिणं शरीराला अनेक फायदे देतं.

चांगली झोप : लवंगात असे नॅचरल गुण असतात, जे मानसिक तणाव कमी करून मेंदू शांत ठेवतात, ज्यामुळे आपल्याला चांगली झोप लागते. झोप चांगली झाली, तर अनेक समस्या दूर होतात.

लिव्हर डिटॉक्स : शरीरातून विषारी तत्व बाहेर काढण्यासाठी लवंग मदत करते. खासकरून रात्री एक किंवा दोन लवंग चावून खाल्ल्यास किंवा याचं पाणी प्यायल्यास लिव्हरची सुद्धा आतून सफाई होते.

सर्दी-खोकला होतो दूर : डॉ. बर्ग सांगतात की, लवंग गरम असते आणि यात अँटी-बॅक्टेरिअल गुण असतात, जे घशातील खवखव, खोकला आणि कफ दूर करण्यास मदत करतात.

दात आणि हिरड्या होतात मजबूत : रात्री लवंग चावून खाल्ल्यास श्वासाची दुर्गंधी दूर होते. सोबतच तोंडाचं आरोग्य चांगलं राहतं तसेच दातांमध्ये होणारी वेदनाही दूर होते

इम्यूनिटी वाढते : वरील सगळ्या फायद्यांसोबतच डॉक्टर सांगतात की, रात्री लवंग खाल्ल्यानं किंवा याचं पाणी प्यायल्यानं यातील अँटी-मायक्रोबिअल गुण शरीराची इम्यूनिटी वाढवतात. ज्यामुळे अनेक रोगांचा धोका कमी होतो.

कसं बनवाल लवंगचं पाणी?

चार ते पाच लवंग एक कप पाण्यात टाकून उकडा. पाच मिनिटांनंतर गॅस बंद करा. हे पाणी थंड झाल्यावर एक तासानं प्या. झोपण्याच्या ३० मिनिटांआधी हे पाणी प्यावं. याचा प्रभाव लवकरच शरीरात दिसू लागेल तसेच लवंग रोज थेट चावूनही खाऊ शकता.

लवंगाचे अनेक फायदे असले तरी जास्त प्रमाणात खाणं नुकसानकारक ठरू शकतं, कारण लवंग गरम असते. जर कुणाला ॲलर्जी असेल किंवा लवंगाचं पाणी पिऊन अस्वस्थ वाटत असेल, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# आदिवासी कुटुंबांला मारहाण

## गुन्हा दाखल नऊ जणांना अटक; पाच दिवसांची पोलीस कोठडी

**मुरूड : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील भालगाव येथील आदिवासी वाडीतील एका आदिवासी कुटुंबांतील पाच जणांना मारहाण करणाऱ्या नऊ जणांविरोधात मुरूड पोलीस ठाण्यात रितसर गुन्हा दाखल करण्यात आला आसुन प्रथम सहा जणांना अटक करण्यात आली तद्नंतर तीन जणांना अटक करण्यात आली असून या नऊ जणांना जिल्हा न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

सविस्तर असे आहे की, रोहा तालुक्यातील भालगाव येथील आदिवासी वाडीत राहणारा कातकरी समाजाचा असणारा सुमीत मंगेश वाघमारे हा मिठागर येथील एका मुलीच्या सोबत तिच्या घरी गणपतीचे दर्शन घेण्यासाठी गेला असता. त्या गोष्टीचा मनात राग धरून मिठागर येथील नऊ जणांनी २८ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ०७.४५ वाजण्याच्या दरम्यान, जमाव जमवुन भालगाव येथील आदिवासीवाडी येथील रस्तावर येऊन मंगेश महादेव वाघमारे यांना हाताबुक्याने व लाथेने मारहाण केली तसेच त्यांची पत्नी-संगिता मंगेश वाघमारे , मुलगा साहिल मंगेश वाघमारे व काका चंदर श्रावण वाघमारे यांच्या डाव्या हातावर मारहाण केली. चुलत भाऊ - राम चंदर वाघमारे यांच्या डोक्यावर तसेच त्यांचा मुलगा-सागर वाघमारे यांच्या उजव्या पायाचे पोटरीवर चाकुने वार करुन गंभीर दुखापत करण्यात आली. ही माहिती प्राप्त होताच ताबडतोब मुरूड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे व पोलिस कर्मचारी घटनास्थळी येऊन प्रथम जखमींना मुरूड ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. फिर्यादी मंगेश महादेव वाघमारे (वय ४२, रा. भालगाव ता.रोहा) यांनी पोलिसांना सविस्तर माहिती देण्यात आल्यावर दिपेश कृष्णा ठाकुर, विजय विठ्ठल पाटील, परेश कृष्णा ठाकुर, विराज विजय ठाकुर, करण विठोबा चिपकर, सुजय संतोष शहापुरकर, दिपेश दत्ताराम माळी, विनिते विजय ठाकुर, सागर पांडुरंग ठाकुर हे सर्व मिठागर पो.सावली ता.मुरुड येथील असुन या ९ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या वेळी अलिबाग रायगड उपविभागीय पोलीस अधिकारी -माया मोरे घटनास्थळी भेट देऊन संपुर्ण यांची माहिती घेण्यात आली.




मारहाण करणारे नऊ पैकी दिपेश कृष्णा ठाकुर, विजय विठ्ठल पाटील, परेश कृष्णा ठाकुर, विराज विजय ठाकूर, करण विठोबा चिपकर, सुजय संतोष शहापुरकर या सहा जणांना अटक करण्यात आली आहे. त्यानंतर दिपेश दत्ताराम माळी, विनिते विजय ठाकूर, सागर पांडुरंग ठाकुर यांनी ही अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे करित आहेत.

## गणेश दर्शन




**मुरूड : ज्या कवींनी मराठी भाषा सर्वदूर पोहचवण्यासाठी आपल्या काव्य लेखनातून मराठी भाषेच्या तेजस्विता व शब्दाचे जाळे विणून सर्व सामान्य लोकांना रुजेल अशा मराठी भाषेचा गुणगौरव करून मराठी भाषेचा अभिमान जोपासून काव्य स्वरूपात जनजागृतीचे कार्य केले. अशा महान कवींचे कार्य चित्र स्वरूपात दाखवण्याचा प्रयत्न राष्ट्रवादीचे नेते मनोज भगत यांनी त्यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाच्या सजावटीद्वारे केला आहे.**



संतोष मिसाळ, लाडिवली. ता.कर्जत



शिवसेवक गुप्ता, कर्जत



**मुरूड : शिवसेना शिंदे गटाचे तालुका बांधकाम विभाग अध्यक्ष दिनेश मिणमिने यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे राजपुरी जिल्हा परिषद मतदार संघाच्या संपर्क प्रमुख जीविता मिणमिने यांनी दर्शन घेतले.**

# माणगाव हे दक्षिण रायगडची राजधानी होईल -खासदार तटकरे

## लवकरच माणगाव नगर पंचायतीचे रुपांतर नगर परिषदमध्ये होणार




**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव हे जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असून तालुक्याचे ठिकाण असल्यामुळे भविष्यात माणगाव हे दक्षिण रायगडची राजधानी होण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली आहे. त्यामुळे माणगाव शहराला आधुनिक बनविण्यासाठी माणगाव नगरपंचायतीचे रुपांतर नगर परिषदमध्ये करणे आवश्यक असल्याने लवकरच माणगाव नगरपरिषद होण्याच्या दृष्टीने जाणिवपूर्वक प्रयत्न करणार आहे, असे अभिवचन रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्याचे खासदार सुनील तटकरे यांनी गेलं इंडीया कंपनीने माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाला दिलेल्या सी. एस. आर. अडीचशे कोटी निधीतून सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या दुसऱ्या टप्प्यातील विविध विकास कामांच्या भूमिपूजनावेळी दिले.

माणगाव शहराचा औद्योगिक, शैक्षणिक आणि सामाजिक लोक विस्तार झपाट्याने वाढत आहे. माणगाव हे दक्षिण रायगडचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून ओळखले जाते. त्यामुळे शहरात पायाभूत आणि भौतिक सुविधा निर्माण करण्यासाठी माणगाव नगरपंचायतीचे रुपांतर नगरपरिषद मध्ये गरजेचे आहे. यासाठी प्रयत्न करीत आहे. त्यासाठी सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. मी पालकमंत्री असताना माणगाव ग्राम पंचायतीचे रुपांतर नगर पंचायतीमध्ये केले होते. रोहा, मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा या नगरपरीषदांना १०० वर्षांचा इतिहास असला तरी माणगावची लोकसंख्या या नगरपरिषदांपेक्षा जास्त आहे. माणगावची लोकसंख्या ही नगरपालिके इतकी आहे. त्यामुळे माणगाव ही सुरुवातीला नगर परिषद होईल. तसेच केंद्र आणि राज्य सरकार कडून अधिकाधिक कोट्यवधीचा निधी उपलब्ध करून जास्तीत जास्त नागरी सुविधा नागरिकांना देता येतील, असा आत्मविश्वास खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला. माणगाव शहरातील भुयारी गटार योजना, भादाव पुल, नाट्यगृह, नाना नाही पार्क, मोर्बा रोड ते मुंबई गोवा महामार्ग, साईनगर कालवा हे सर्व्हिस रोड, अंतर्गत रस्ते आणि गटारे आदी विविध विकास कामे लवकरच पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. तसेच इंदापूर आणि माणगाव बायपासचे काम तातडीने सुरू करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे. येथील माणगाव




शिक्षण प्रसारक मंडळाला विविध प्रकारचे शैक्षणिक दालने सुरू करण्यासाठी विविध प्रकारच्या शासकीय माध्यमातून मदत करणार आहे. माणगावमध्ये गरीबांच्या मुलांनाही येथेच उच्च शिक्षण मिळणार आहे. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांनी दुरदृष्टी ठेवून श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे नर्सिंग कॉलेज करुन देश आणि परदेशात नोकऱ्या उपलब्ध करून देणार आहेत. पाश्चिमात्य देशात नर्सिंग कोर्सला भरपूर संधी प्राप्त असून राज्य सरकारच्या माध्यमातून सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. येथे सीबीएसई इंग्रजी शाळा सुरू करून उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे भविष्यात येथील विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत राहणार आहेत, असा आत्मविश्वास खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त करुन काही वर्षांत सुरू होणाऱ्या येथील मेडिकल कॉलेजला सर्व प्रकारची मदत करण्याची तयारी दाखवली. दिल्ली - मुंबई कॉरिडॉर औद्योगिक प्रकल्पाच्या माध्यमातून ३० हजार कोटी मंजूर केले आहेत. माणगाव तालुक्यातील महामार्गावरील गावांजवळ जवळ विविध प्रकारचे प्रकल्प सुरू करण्यात येत आहेत. दिघी बंदर विकसित होत आहे. त्यासाठी किमान कौशल्यावर आधारित कोर्स सुरू करण्यात येत आहेत. ना. आदिती तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली लेदरचा प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे. संगीत कला अकादमी सुरू करण्यात येणार आहे. माणगाव आणि रोहा शहरात हायमास दिले मंजूर करण्यात आले आहेत. जनतेला काय हवंय यांची मला कल्पना असल्याने ती कामं साकार करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. नवं आधुनिक माणगाव घडविण्यासाठी सर्वांनी मिळून मिसळून काम करण्याचे आवाहन करून माणगाव करांनी साथ सोबत द्यावी, असे आवाहन खासदार तटकरे यांनी केले.

## कराडे येथील बेलेंत्रा सोसायटीतील व्यक्तीची आत्महत्या

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नोकरी गेल्याने आर्थिक विंवचनेतून आलेल्या नैराश्यामुळे कराडे येथील बेलेंत्रा सोसायटीमधील एका इसमाने आत्महत्या केल्याची घटना घडली. या बाबतीत हकिकत अशी की भरत दशरथ सरवणकर (वय ४८) रा बेलेंत्रा सोसायटी कराडे खुर्द हे नोकरी गेल्याने आर्थिक अडचणीत होते. त्यांना चार वर्षापासून झोप येत नव्हती. त्यामुळे त्रस्त होवून त्यांनी राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. सदर प्रकरणी भूमी भरत सरवणकर यांनी रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली असता आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायतीकडून शाश्वत सणांचा प्रसार



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत वासांबे मोहोपाडा यांच्यावतीने माझी वसुंधरा ६.० अंतर्गत पर्यावरणपूरक (शाडूची माती)मूर्ती बसविणे व कृत्रिम जलाशयामध्ये मुर्ती विसर्जन करणे, ओला कचरा व सुका कचरा विलिनीकरण करणे, घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी व्यवस्थापन करण्याबाबत ग्रामपंचायत हद्दीतील २५ पेक्षा अधिक गावांत जनजागृती करण्यात आली. त्याचबरोबर वृक्षलागवड, फटाके बंदी, सेंद्रीय शेती, बायोगॅस, पावसाचे पाणी जमिनीत जिरवण्यासाठी रेन हार्वे सर्टींग आदीबाबत सरपंच उमाताई संदिप मुंढे, उपसरपंच दिपक कांबळे, ग्रामपंचायत अधिकारी वैभव पाटील, सर्व ग्रामपंचायत सदस्य व कर्मचाऱ्यांनी आवाहन केले.

दरम्यान, गणेशोत्सवात दिड दिवसांच्या बाप्पाला निरोप देताना मोहोपाडा तलावाच्या काठावर माझी वसुंधरा ६.० अभियानाअंतर्गत शेड उभारुन कृत्रिम जलाशय विसर्जन करण्यासाठी तरुणांचे पथक नेमण्यात आले होते.कचरा व हार,फुले निर्माल्य कलशात टाकण्याचे आवाहन करण्यात आले.यावेळी दिड दिवसांच्या बाप्पांना भावपुर्ण निरोप देताना गणेशभक्तांनी आपल्या जवळील कचरा निर्माल्य कलशात टाकून पर्यावरण संवर्धन केले.

# जिल्हास्तरीय घरगुती गणपती सजावट स्पर्धा

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक, शैक्षाणिक संक्षेत्रात संपूर्ण राज्यभर आपल्या कामाचा ठसा उंटावणाऱ्या जिजाऊ शैक्षणिक, सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य व शिवसेनेतर्फे रायगड जिल्हास्तरीय घरगुती गणपती सजावट स्पर्धा २०२५ आयोजन जिजाऊ संस्थेचे संस्थापक तथा शिवसेनेचे उपनेते निलेश सांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

या स्पर्धेकरिता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कॅबिनेट मंत्री भरत गोगावले यांनी आयोजकांना तसेच सर्व गणेश भक्तांना शुभेच्छा दिल्या आहेत. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी व्हिडीओमध्ये स्पर्धकाने देखावा बनवण्याचे कारण व भावना, देखावा बनवताना वापरलेल्या वस्तू तसेच घरातील व्यक्तींचा सहभाग, देखावा बनवण्यासाठी लागलेला कालावधी, देखावा बनवण्यासाठी आलेला खर्च नमूद करावा. व्हिडीओ बनवताना स्पर्धेच्या नावाचा व संस्थेच्या नावःचा उल्लेख करणारे बंधनकारक असेल. स्पर्धकाने डेकोरेशनचे विवीध बाजूनी काढलेले पाच फोटो व एक व्हिडीओ रील (८३६९५६७०९५) या नंबरवर संपूर्ण पत्ता व नावासहीत पाठवणे आवश्यक आहे. या स्पर्धेकरिता प्रथम पारितोषिक रोख रुपये ७७७७, द्वितीय पारितोषिक रोख रुपये ५५५५ तृतीय पारितोषिक रोख रुपये ३३३३ व प्रत्येकी २२२२ रुपयांची प्रत्येकी तीन उत्तेजनार्थ पारितोषिके देऊन विजयी स्पर्धकांना मान्यवरांच्याहस्ते गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील जास्तीतजास्त स्पर्धकांनी घ्यावा, असे आवाहन धीरज सांबरे व सभासद यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ९०२९९७७७७० व ७७९८७०९८७६ या नंबरवर संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

**ड्रायव्हर पाहिजे**

**फॉर्च्युनर कारसाठी ड्रायव्हर पाहिजे**

१०२, सी-विंग, साक्षी पार्क-२, शिलोत्तर रायचूर, सुकापूर, नवीन पनवेल, जिल्हा रायगड (महाराष्ट्र)

माऊली एंटरप्रायजेस, जेएनपीटी, जासई-४१०२०६

संपर्क

**मोबाईल : ८१०८४००२१४**

**Email : ekanathpatil4141@gmail.com**



**माणगाव : साबळे कुटुंबियांच्या गणपतीचे मंत्री भरत गोगावले यांनी दर्शन घेतले. या वेळी ज्येष्ठ नेते संजय साबळे, नगरसेवक प्रशांत साबळे, उद्योजक वैभव साबळे, समीर साबळे, अभिजित साबळे आदी उपस्थित होते.**


# रघुनाथ माळी यांची पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची संकल्पना पुढेही सुरूच

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड शहरात लक्ष्मीखर येथे गेली ५० वर्ष १२ फूट गणेश मूर्ती बनवण्याची परंपरा रघुनाथ माळी व विजय माळी यांच्या घरी सुरू आहे. मुरूडला मोठा गणपती म्हणजे माळी कुटुंबाचा होता. मुरूडमध्ये मोठी मूर्ती एक काच बनत असत ती म्हणजे रघुनाथ माळी यांच्या घरी माळी हे मुंबईत नोकरी करत मूळचे कलाकार असल्याने गणेश मूर्ती सुटी घेऊन स्वतः घरी बनवत असत आणि विशेष म्हणजे ज्या खोलीत गणेश मूर्ती स्थापना होते. त्या खोलीचा दरवाजा ७ फूट आहे, पण आतील मूर्ती १० फूट असायची हे पाहण्यासाठी मुरूडकर रांगा लावत असत

२०१२ साली रघुनाथ माळी यांचे आकस्मित निधन झाल्याने ही परंपरा खंडित होते कि काय असे वाटत होते, परंतु रघुनाथ माळी यांचे दोन्ही मुलगे कलाकार असल्याने कल्पेश माळी त्यांनी पर्यावरण पूरक कागदाच्या लगद्यापासून १० फुटी गणेश मूर्ती बनवणे सुरूकेले हायवर्षी कागदापासून कासवावर आरूढ झालेली गणेशमूर्ती सुंदर बनवली असल्याने त्याचे कौतुक होत आहे.

१० फुटी गणेशमूर्ती कागदापासून बनल्यामुळे हिला उचलण्यासाठी १ माणूस खूप होतो वजनाला हलकी व पाण्यात सहज विरघळणारी असल्याने मूर्तीला पाहण्यासाठी कलाकार मंडळी भेट देतात. अशारितीने माळी कुटुंबाने कलेचा वारसा पुढे सुरू ठेवला आहे.



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-13/25-26 7000037280 | Annual Maintenance contract for routine maintenance of Nitrogen injection fire protection system (NIFPS) including replacement of faulty spares at various substation under Panvel circle. For F.Y. 2025-2026 & 2026 -2027 **Tender Fee Rs. 500/- + GST.** | Limited to Rs. 25.00 Lakhs |

EMD 1 % of estimated cost. **Submission of bids from 29.08.2025 to 15.09.2025 up to 11:00 hrs, Opening date: 15.09.2025 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459625, Mob. No. 8412050202 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV (O&M) Circle, Panvel**

# रायगडात गणेशोत्सवाची धूम; गौरीचेही आगमन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**





रायगड जिल्ह्यासह कोकणात उदंड उत्साहात साजरा करण्यात येणारा उत्सव म्हणजे गणेशोत्सव. सध्या घरोघरी तसेच सार्वजनिक स्वरूपात गणपती बाप्पा विराजमान झाले असून रविवारी (दि. ३१) गौराई मातादेखील पाहुणी आली. त्यामुळे भाविकांचा आनंद द्विगुणित झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

गणपती ही विद्येची देवता असल्यामुळे कोणत्याही शुभकार्याच्या प्रारंभी त्याची पूजा करण्याचा प्रघात आहे. कोकणातील हा सर्वात महत्त्वाचा उत्सव असल्यामुळे जगाच्या पाठीवर असलेला कोणताही कोकणी माणूस या उत्सवासाठी आपल्या गावी जाण्यास उत्सुक असतो. कोकणात सार्वजनिक गणेशोत्सवापेक्षा घरगुती गणतींची संख्या जास्त असून जवळपास प्रत्येक घरामागे एक गणपती दिसतो.

कोकणातली गणेश चतुर्थी हा आबालवृद्धांसाठी अगदी जिव्हाळ्याचा विषय असतो. हा उत्सव ही सांगण्या-ऐकण्याची नव्हे; तर अनुभवण्याची गोष्ट आहे. मुंबईसारख्या शहरात चिनी गणेशमूर्तींची आवक झालेली दिसते, पण कोकणात अजूनही पारंपरिक पद्धतीने गणपतीच्या मूर्ती बनवल्या जातात.

गणपतीसाठी घराघरांत भिंती रंगवल्या जातात. देखण्या देखाव्यांनी भिंती सजतात. मखराच्या कलाकुसरीचे काम करण्यात येते. गणपतीच सगळे यथासांग पार पाडणार हा आत्मविश्वासच भाविकांना बळ देत असतो. मुलाबाळांचा जल्लोष सुरू असतो.

अख्खे कोकण खऱ्या अर्थाने हा सण साजरा करीत असते. घरोघरी गणरायाला विधीवत पूजले जाते. पाहुणे, मित्र-मंडळी यांची सतत ये-जा सुरू असते. त्यांना करंज्या, मोदक, पंचखाद्य, लाडू असे फराळाचे पदार्थ देण्यात येतात, तर भजनाला येणाऱ्या मंडळींसाठी खास उसळीचा बेत आखला जातो.

यंदाही गणेशोत्सवात जिकडे बघावे तिकडे या उत्सवाची धूम दिसून येते. प्रत्येक माणूस चैतन्याने भरून गेलेला असून गौरी मातेच्या आगमनाने महिलावर्ग सुखावला आहे. सोमवारी १ सप्टेंबर रोजी ज्येष्ठा गौरी पूजन होईल. सकाळी ५.५९ ते संध्याकाळी ६.४३ या वेळेत पूजेचा शुभ मुहूर्त आहे, तर २ सप्टेंबरला गणपतीसोबत गौरींचे विसर्जन केले जाईल.

### माहेरवाशिणी सुखावल्या

गणपतीपाठोपाठ त्याची माता गौरीचे रविवारी सायंकाळी आगमन झाले. गणपतीबरोबर येणाऱ्या गौरी सणाला एक वेगळे महत्त्व असते. गौरी हे भगवान शंकराच्या शक्तीचे आणि गणेशाच्या आईचे रूप मानले गेले आहे. गौरींची स्थापना करुन त्यांचे मनोभावे पूजन करण्यात येते. गौरी पूजनाच्या दिवशी कोकणात ओवसा पद्धत केली जाते. सुवासिनी गौरीला वाण देतात. रात्री गौरीचे जागरण केले जाते. या पार्श्वभूमीवर गौरीचे वैशिष्ट्यपूर्ण मुखवटे, असंख्य प्रकारचे दागिने, साड्या आणि सजावट साहित्याने सजलेल्या बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी महिलांची दिवसभर वर्दळ दिसून आली. माहेरवाशिणींसाठी गौरीचे महत्त्व अनन्यसाधारण असून त्या आवर्जून येत पूजन करतात. त्या दृष्टीने लगबग सुरू आहे.

## भेंडखोल ग्रामस्थांकडून गणेश विसर्जन घाटाची श्रमदानातून स्वच्छता

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र दक्षिण काशी हरिहरेश्वरलगत सावित्री सिंधूच्या तीरावर वसलेले निसर्गरम्य भेंडखोल हे कोकणातील एक महत्त्वाचे गाव. दरवर्षी गणेशोत्सवात या किनाऱ्यावर दीड, पाच तसेच अनंत चतुर्दशीच्या बाप्पाचे विसर्जन केले जाते, मात्र या वर्षी विसर्जन घाट परिसरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसत होते. या पार्श्वभूमीवर भेंडखोल गावातील काही तरुणांनी पुढाकार घेत श्रमदान करीत स्वच्छता केली.

या स्वच्छता मोहिमेत केतन कोलथरकर, सुकृत कोलथरकर, सार्थक मयेकर यांच्यासह ग्रामस्थांनी एकत्र येऊन विसर्जन घाट आणि परिसर स्वाफ केला. गणेशभक्तांना आपल्या लाडक्या बाप्पाला अखेरचा निरोप देताना कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, हीच पवित्र भावना मनामध्ये ठेवून या स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले.

गावकऱ्यांनी स्वतः श्रमदान करून समुद्रकिनारा स्वच्छ व सुंदर केला. त्यामुळे विसर्जन मिरवणुकीचा मार्ग स्वच्छ आणि सोयीस्कर झाला. या कार्यामुळे विसर्जन घाट परिसर पुन्हा एकदा स्वच्छ, सुटसुटीत आणि आकर्षक दिसू लागला. ग्रामस्थांच्या या श्रमभक्तीचे आणि सामाजिक जाणीवेचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा

**रायगड : रामप्रहर वृत्त**




ग्रामीण आणि शहरी भागात क्रीडा संस्कृतीचा प्रसार व्हावा यासाठी हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिन राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. हा दिवस रायगड जिल्ह्यात नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला.

जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथे मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास खासदार धैर्यशील पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, शिक्षणाधिकारी महारुद्र नाळे तसेच राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी उपस्थित होते.

खासदार धैर्यशील पाटील यांनी खेळ केवळ मनोरंजन किंवा फिटनेससाठी मर्यादित न ठेवता करिअर म्हणून गंभीरतेने घ्यावा, असे आवाहन खेळाडूंना केले. ग्रामीण भागात क्रीडा सुविधा उपलब्ध करून दिल्यास उत्कृष्ट खेळाडू तयार होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला तसेच क्रीडाविकासासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

जिल्हाधिकारी जावळे यांनी खेळामुळे शारीरिक व बौद्धिक क्षमतांचा विकास होतो, असे सांगून शासनाच्या बदलत्या क्रीडा धोरणांचा खेळाडूंनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

प्रस्ताविकेत जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी मेजर ध्यानचंद यांच्या कारकीर्दीचा आढावा घेत सांगितले की, त्यांनी सैन्यातून हॉकी खेळाला सुरुवात केली आणि कारकिर्दीत तब्बल एक हजाराहून अधिक गोलांची नोंद केली. त्यांच्या स्मरणार्थ सर्वोच्च 'ध्यानचंद क्रीडा पुरस्कार' जाहीर करण्यात आला असल्याचे त्यांनी नमूद केले.

या निमित्ताने आयोजित तीन किमी मॅरेथॉन स्पर्धेत शंभरहून अधिक खेळाडूंनी विविध वयोगटातून सहभाग नोंदवला. जिल्हाधिकारी जावळे यांनीदेखील उत्स्फूर्त सहभाग घेतला. या कार्यक्रमात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके जिंकलेल्या खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## माजी विद्यार्थ्यांकडून शिक्षकांचा गुणगौरव

**मुरुड : प्रतिनिधी**



सन २००७-०८च्या दहावी शालांत परीक्षेत उत्तीर्ण होऊन विविध नोकरी, कामधंदा, व्यवसायानिमित्त ठिकठिकाणी गेलेले वर्गमित्र विद्यार्थी गणेशोत्सवाला गावच्या घरी परतले. यशवंतनगरच्या नांदगाव येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपले तत्कालीन ज्येष्ठ शिक्षक गणेश वामन ठोसर, मुख्याध्यापिका अर्चना खोत, माजी शिक्षक उदय खोत या आवडत्या शिक्षकांचा त्यांच्या घरी जाऊन सत्कार करुन त्यांनी त्यांच्या प्रती असलेल्या आपल्या सद्भावना व्यक्त केल्या.

या विद्यार्थ्यांमध्ये विक्रांत कुबल, मंदार घुमकर, कौस्तुभ जोशी, प्रणय निरकर, नेहल पुळेकर, तुषार नांदगावकर, मयुर म्हात्रे, सिध्देश ठाकूर, विवेक पोतदार, विशाल गिरणेकर, शशिकांत चेवले, सुदेश नाईक, केजल अंबुकर, दिपेश पाटील, प्रतिक थळे, मिथिलेश कुमरोटकर, राजू भोईर, प्रफुल्ल शेंगाळे, नरेंद्र घरत, दीपक पतेने, मनिष पाटील, प्रशांत नांदगावकर, प्रमोद बागवे, विजेंद्र नांदगावकर, किशोर धनावडे आदींचा समावेश होता.

जाणता राजा श्री छत्रपती शिवाजी महाराजांची तसबीर, शाल, श्रीफळ देऊन या विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या शिक्षकांचा सन्मान केला आणि त्यांचे आशीर्वाद घेऊन कृतज्ञता व्यक्त केली.

## कर्जत तालुका पावसाळी क्रीडा महोत्सव
### विविध खेळांमध्ये विद्यालयांचा सहभाग

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका पावसाळी क्रीडा महोत्सवातील बुद्धिबळ आणि व्हॉलीबॉल स्पर्धेत मोठ्या प्रमाणावर खेळाडूंनी सहभाग घेतला. बुद्धिबळ स्पर्धेत कर्जत शहरातील शारदा मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी तीन गटात विजेतेपद पटकाविले, तर कशेळे येथील ऑर्किड इंग्लिश मिडीयम स्कूल यांनी दोन गटात विजेतपद मिळविले. याशिवाय व्हॉलीबॉल स्पर्धेत शासकीय आश्रमशाळा पिंगळस यांनी तीन गटात विजेतेपद मिळविले.

कर्जत तालुका पावसाळी क्रीडा स्पर्धा संपन्न असून बुद्धिबळ आणि व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन कर्जत शहरातील गुंडगे येथील गुड शेफर्ड कॉन्व्हेन्ट स्कूल येथे करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन तालुका गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे आणि गुड शेफर्ड शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर अमला यांच्या हस्ते झाले. यावेळी तालुका गट समन्वयक प्रदीप सुर्वे आणि तालुका क्रीडा समन्वयक किशोर पाटील, समीर येरुणकर आदी प्रमुख उपस्थित होते.

बुद्धिबळ आणि व्हॉलीबॉल स्पर्धेचे नियोजन तालुका पावसाळी महोत्सव समितीचे मालू गायकवाड, अंकित जोशी, जयवंत पारधी, नितीन सुपे, जगदीश जाधव, अजय डाळिंबकर, जनार्दन पजई, स्वप्नील नामदास आदींनी केले होते.

व्हॉलीबॉल स्पर्धेत १४ वर्षे गटातील मुलांमध्ये शारदा मंदिर डिकसळ प्रथम व विद्या विकास नेरळ दुसरे आले. मुलींच्या गटात अभिनव ज्ञानमंदिर शाळा कर्जत प्रथम व नेरळ विद्यामंदिर शाळेच्या मुलींनी दुसरा क्रमांक पटकावला. १७ वर्षाखालील मुले गटात पिंगळस शासकीय आदिवासी आश्रमशाळा प्रथम व नेरळ विद्यामंदिर दुसरे आले. मुलींच्या गटात नेरळ विद्या मंदिर प्रथम व विद्या विकास नेरळ दुसरे आले. १९ वर्षाखालील गटात पिंगळस शासकीय आदिवासी आश्रमशाळा प्रथम व नेरळ विद्यामंदिर दुसरे आले, तर याच वयोगटातील मुलींच्या गटात पिंगळस शासकीय आदिवासी आश्रमशाळा प्रथम व नेरळ विद्यामंदिर दुसरे आले.

### विद्यार्थ्यांनी मिळवले यश

बुद्धिबळ स्पर्धेत कर्जत तालुक्यातील सर्व बीटमधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा रंगली. या स्पर्धेत प्रत्येकी तीन विद्यार्थ्यांनी आपापल्या गटात विजेतेपद मिळविले. बुद्धिबळ स्पर्धा १४ वर्षाखालील, १७ वर्षाखालील आणि १९ वर्षाखालील गटात मुली आणि मुले अशी झाली. १४ वर्षाखालील मुलांमध्ये शारदा मंदिर कर्जत येथील सार्थ लोभी, तर मुलींच्या गटात शारदा मंदिर कर्जत शाळेची प्रेक्षा कापसे प्रथम आली. १७ वर्षाखालील गटात मुलांमध्ये कर्जत एज्युकेशन सोसायटीचा साईराज लोहारे प्रथम आणि मुलींमध्ये शारदा मंदिर कर्जत शाळेच्या ज्ञानदा गुजराथी हिने प्रथम क्रमांक पटकावला. १९ वर्षाखालील गटात मुलांमध्ये ऑर्किड इंग्लिश मिडीयम स्कूल कशेळे येथील आदित्य सफळे याने, तर मुलींच्या गटात ऑर्किड इंग्लिश मिडीयम स्कूलची गोमजी कुंजीर प्रथम आले.

कर्जत तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धेत विविध विद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले. या सर्वांचे अभिनंदन होत आहे. अनेकांनी त्यांना याबद्दल शुभेच्छा देत कौतुक केले.



## कळंब-पोसरी नदीपुलावर खड्डे

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ-कळंब व कर्जत-मुरबाड या मुख्य मार्गावरील कळंब-पोसरी नदीवरील पुलावर मोठमोठे खड्डे पडले असून हा पूल आता वाहतुकीसाठी जीवघेणा ठरत आहे.

रात्रीच्या अंधारात किंवा पावसात हे खड्डे दिसत नसल्याने वाहनधारकांचे मोठे हाल होत आहेत. दररोज हजाराहून अधिक वाहने या पुलावरून जात असून अनेक वाहने खड्ड्यांमध्ये आदळतात.

हा पूल जुना असून यातील काही भाग आधीच कोसळला आहे. लोखंडी भाग उघड्यावर आल्याने पुलाची अवस्था धोकादायक झाली आहे. येथे कधीही मोठी दुर्घटना घडू शकते, अशी भीती व्यक्त केली आहे. या रस्त्याची पाहणी करून खड्डे भरण्याचे काम करावे, अशी मागणी होत आहे.

# वाचाल तर वाचाल देखावा
## माणगावमध्ये गणेशोत्सवातून वाचनाचा प्रबोधनात्मक संदेश

**माणगाव : प्रतिनिधी**



श्री गणरायाचे सर्वत्र मोठ्या भक्तिभावाने आगमन झालेले असून श्री गणरायासाठी तयार केलेल्या मखरांचे, आरासचे देखावे भाविकांचे मन वेधून सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक संदेश देत आहेत. याच देखाव्यांच्या पार्श्वभूमीवर गणरायांसाठी बनविलेल्या वाचाल तर वाचाल देखावा भाविकांचे मन वेधून घेतले. माणगाव येथील शिक्षक अजित शेडगे यांच्या घरी बनवलेला वाचाल तर वाचाल हा देखावा भक्तांचे आकर्षण ठरला.

या देखाव्याच्या माध्यमातून वाचनाचा संदेश देण्यात आला. या देखाव्याच्या माध्यमातून त्यांनी वाचनाचे महत्त्व, वाचन आवड निर्माण व्हावी यासाठी करावयाच्या उपाययोजना, महान व्यक्तींनी वाचनाविषयी सांगितलेले महत्त्व, पुस्तकांची यादी व त्यांचे प्रदर्शन मांडले तसेच विविध सुविचार, घोषवाक्य यांच्या माध्यमातून त्यांनी या देखाव्यातून वाचन चळवळीचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

गेल्या काही वर्षांपासून वाचन चळवळ वृद्धिंगत होण्यासाठी सामाजिक, शैक्षणिक पातळीवर अनेक प्रयत्न केले जात आहेत. वाचनाची चळवळ अधिक दृढ होण्यासाठी केल्या जात असणाऱ्या प्रयत्नांचा हाही एक भाग असून श्री गणरायाच्या बरोबरच वाचन चळवळीचे महत्त्व पटवून देणारा हा देखावा भाविकांसाठी आकर्षणाचा विषय ठरत आहे. वाचन चळवळीचे महत्त्व सांगणारा हा देखावा पाहिल्यानंतर अनेक मान्यवरांनी या देखाव्याच्या संकल्पनेचे कौतुक केले आहे.

**वाचन चळवळ अधिक दृढ व्हावी व वाचनचे महत्त्व देखाव्याच्या माध्यमातून कळावे यासाठी केलेला हा प्रयत्न आहे. या देखाव्याच्या माध्यमातून वाचनाचे महत्त्व कळेल व वाचन चळवळ वृद्धिंगत होईल.**

**-अनघा शेडगे, देखाव्यकर्त्या, शिक्षिका**

**वाचन चळवळ अधिक दृढ होण्यासाठी देखाव्याचा हा प्रयत्न अतिशय स्तुत्य असून यामुळे वाचनाचे महत्त्व निश्चितपणे कळून येईल.**

**-पांडुरंग तळवटकर, भाविक**

# मराठा प्रवर्गासाठी महामंडळाच्या कर्ज योजना : व्यवसाय व उद्योगाला चालना

महाराष्ट्र शासनाच्या महामंडळांतर्गत सुरु असलेल्या कर्ज व्याज परतावा योजनांमुळे मराठा प्रवर्गातील युवक-युवतींसमोर स्वावलंबनाचे नवे मार्ग खुले झाले आहेत. या योजना पूर्णपणे ऑनलाईन व पारदर्शक पद्धतीने राबवण्यात येत असून लाभार्थ्यांनी आपली सर्व कागदपत्रे व माहिती अधिकृत संकेतस्थळावर (www.udyog.mahaswayam.gov.in) अपलोड करणे बंधनकारक आहे.

**सामाईक अटी व शर्ती**

अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक, योजना प्रामुख्याने मराठा प्रवर्गासाठी असून स्वतंत्र महामंडळ नसलेल्या इतर प्रवर्गांनाही लागू,

**वयोमर्यादा**

स्त्री-पुरुषांसाठी कमाल ६० वर्षे,वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ८ लाख,कर्ज महाराष्ट्रात कार्यरत बँकेमार्फतच घेतलेले असावे, दिव्यांग अर्जदार मानसिकदृष्ट्या सक्षम असावा, गट कर्ज योजनेत (IR-२) वयोमर्यादा ६० वर्ष इतकी आहे.

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (IR-१)**

या योजनेत कर्ज मर्यादा रु. १५ लाखांपर्यंत वाढविण्यात आली आहे,

व्याज परतावा : जास्तीत जास्त रु. ४.५ लाखांपर्यंत,कालावधी : ७ वर्षे, व्याजदर : कमाल १२%,

लाभ : बँकेमार्फत घेतलेल्या व व्यवसाय/उद्योगासाठी मंजूर कर्जावरच लागू.

**गट प्रकल्प कर्ज व्याज परतावा योजना (IR-२)**

दोन किंवा अधिक सदस्यांनी एकत्रितपणे कर्ज घेतल्यास गट प्रकल्प योजनेचा लाभ मिळतो.

दोन सदस्य : कमाल २५ लाख

तीन सदस्य : ३५ लाख,

चार सदस्य : ४५ लाख,

पाच व त्यापेक्षा अधिक सदस्य : ५० लाखांपर्यंत कर्ज.

**आवश्यक कागदपत्रे**

आधारकार्ड (अपडेटेड मोबाईल व ई-मेल आयडीसह), रहिवासी पुरावा (दाखला/लाईट बिल/बँक पासबुक), उत्पन्नाचा दाखला किंवा ITR, जातीचा दाखला, एक पानी प्रकल्प अहवाल.

**कार्यपद्धती**

LOI (पात्रता प्रमाणपत्र) मिळाल्यानंतर प्रकल्प अहवालासह बँकेत कर्ज प्रकरण दाखल करणे.

बँक कर्ज मंजुरीनंतर त्यासंबंधी माहिती ऑनलाईन प्रणालीवर अपलोड करणे. EMI वेळेवर भरल्यावर त्याचा पुरावा बँकेकडून घेऊन अपलोड करणे.

पडताळणीनंतर व्याज परतावा थेट अर्जदाराच्या खात्यात जमा होईल.

कर्ज प्रक्रियेत सिबिल स्कोअर (CIBIL Score)ला विशेष महत्त्व आहे.

श्रेणी : ३०० ते ९००

७५०पेक्षा जास्त स्कोअर चांगला मानला जातो.

वेळेवर EMI भरणे, क्रेडिटचा मर्यादित वापर आणि आर्थिक शिस्त पाळणे आवश्यक.

महामंडळाच्या योजनांमुळे मराठा प्रवर्गातील युवक-युवतींसमोर उद्योजकतेचे दार खुले झाले आहे. व्यवसायासाठी आवश्यक आर्थिक आधार, कमी व्याजाचा ताण आणि शासनाची हमी यामुळे नव्या उद्योगांना प्रोत्साहन मिळणार आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजनेतर्गत २०१८ ते २०२५पर्यंत जिल्ह्यात ५४८ लाभार्थ्यांना आता पर्यंत लाभ देण्यात आला आहे तर नवीन ५०९ अर्जदारांनी महामंडळाकडे अर्ज केला आहे.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग**

